ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री कामगारांसंदर्भातील योगदान

**प्रतिभा जयवंत जाधव.**

Ph.D. Scholar, **अर्थशास्त्र विभाग,**

**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई - २०.**

**सारांश :**

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री कामगारांसाठी केलेल्या विशेष तरतूदी आणि कायदे तसेच घटनात्मक हक्क व अधिकार याचा फायदा आजही स्त्री कामगारांना मिळत आहे.*

**कळ शब्द :**

*मजूरमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्त्री कामगारविषयक कायदे, स्त्री कामगारांचे संविधानिक हक्क व अधिकार.*

Aarhat Publication & Aarhat Journals is licensed Based on a work at http://www.aarhat.com/amierj/

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री कामगारांसंदर्भातील कार्य अभ्यासणे.
- स्त्री कामगारविषयक तरतूदी व कायद्यांच्या अनुषंगाने, सद्य स्थितीत स्त्री कामगारांना मिळणाऱ्या सोयी सुविधा अभ्यासणे.
- स्त्री कामगारांच्या दृष्टीने उपयुक्त धोरणात्मक शिफारशी सुचविणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांच्या आधारे आवश्यक ती माहिती संकलित करण्यात आली आहे.

**अ ] प्राथमिक आधार सामुग्रीचे स्त्रोत**

- अभ्यासाकरिता आवश्यक असणारी प्राथमिक स्वरूपाची आधारसामुग्री संकलित करण्यासाठी संरचित प्रश्नावलींचा वापर करण्यात आला आहे.
- वैयक्तिक व सामुहिक मुलाखतींच्या आधारे प्रश्नावली भरून घेण्यात आल्या आहेत.

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

**ब ] दुय्यम आधारसामुग्रीचे स्त्रोत**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित साहित्य ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शासनाने प्रकाशित केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य, विविध संदर्भ ग्रंथ, पाक्षिके, मासिके, वृत्तपत्रे, संशोधन लेख, इत्यादी अशा विविध स्त्रोतांच्या माध्यमातून अभ्यासाकरीता आवश्यक असणारी दुय्यम स्वरूपाची माहिती संकलित करण्यात आली आहे.

**क ] नमुना निवड**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री कामगारांसंदर्भातील योगदान अभ्यासण्यासाठी एकूण २२६ कामगार स्त्रियांचा यादृच्छिक पद्धतीने नमुना निवडला आहे.

**ड ] माहितीचे विश्लेषण**

- कामगार स्त्रियांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन प्रश्नावली भरून घेण्यात आल्या आहेत.
- संकलित माहितीचे वारंवारितेनुसार, वयानुसार, धर्मानुसार, वर्गानुसार आणि शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे.
- उपयुक्त संख्याशास्त्रीय साधने आणि तंत्रांचा वापर करून विविध वर्गीकरण, वारंवारिता व टक्केवारी इत्यादींच्या माध्यमातून संकलित माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.
- विश्लेषणामध्ये सहजता यावी याकरिता स्तंभालेख व वर्तुळाकृती आलेखांचा देखील वापर करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

‘एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व' म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जगात ख्याती आहे. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक इत्यादी अशा जवळजवळ सर्वच क्षेत्रांत त्यांचे योगदान आहे. विशेषतः स्त्रियांच्या विकासात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. भारताच्या सक्षमीकरणा- साठी त्यांनी स्त्रियांना केंद्रबिंदू मानले. कारण ‘स्त्रियांचे सबलीकरण झाल्याशिवाय समाजाचे आणि पर्यायाने राष्ट्राचे सबलीकरण केवळ अशक्य आहे.’ अशी त्यांची धारणा होती.

माझ्या शोधनिबंधात मी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री कामगारांसंदर्भातील योगदान' अभ्यासणार आहे.

**मुख्य विषय :**

**१. <u>कामगार मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री कामगारांसाठीच्या तरतूदी</u>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. कामगारांना संघटित करणे आणि त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी या राजकीय पक्षाची स्थापना केली गेली. या पक्षाच्या जाहीरनाम्यात भूमिहीन गरीब कुळे, शेतकरी आणि कामगार यांच्या आवश्यक गरजा आणि गाऱ्हाणी मांडली होती. विविध क्षेत्रांतील

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

स्त्री-पुरुष सर्वच कामगारांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लढले. परंतु 'कामगारांमध्येही स्त्री-पुरुष या लैंगिक असमानतेमधून स्त्रियांचे शोषण होते' ही बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नजरेतून सुटली नाही. म्हणूनच स्त्री कामगारांसाठी विशेष तरतुदींची गरज त्यांना भासली. स्त्री कामगारांच्या समानतेसाठी, हक्कांसाठी ते लढले. कामगार स्त्रियांचे हक्क आणि विकास हे केवळ उपदेशाने साध्य होणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कायद्यातच तरतूद करावी लागेल. हे त्यांनी ओळखले होते.

९ जुलै १९४२ रोजी व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 'मजूर मंत्री' म्हणून नेमणूक झाली. मजूर मंत्री म्हणून त्यांनी इतर कामगारांबरोबरच स्त्री कामगारांचेही प्रश्न धसास लावण्याचा सपाटा सुरू केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री कामगारांसाठी केलेल्या तरतुदींचा आढावा पुढील प्रमाणे:-

**<u>स्त्री कल्याण विधेयक</u> :-**

२० जुलै १९४२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय दलित वर्ग महिला परिषदेचे दुसरे अधिवेशन नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात कामगार आणि अस्पृश्य स्त्रियांसंदर्भात काही महत्त्वपूर्ण ठराव पास करण्यात आले.

ते पुढीलप्रमाणे:-

१. अ. स्त्री वर्ग शिक्षणात अत्यंत मागासलेला असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रांतिक सरकारांनी प्रत्येक इलाख्याच्या ठिकाणी पन्नास मुलींचे वसतिगृह सरकारी खर्चाने काढावे.

   ब. अत्यंत दारिद्र्यात असलेल्या अस्पृश्य वर्गातील मुलींच्या दुय्यम आणि उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी सर्व सरकारी व निमसरकारी शाळांमधून फ्रिशीप व स्कॉलरशिप देण्याची तरतूद प्रत्येक प्रांतिक सरकारांनी करावी.

   क. अस्पृश्य वर्गातील स्त्रियांचा अशिक्षित व मागासलेपणा घालविण्यासाठी प्राथमिक शिक्षणाची योजना तयार करून ती ताबडतोब अंमलात आणावी.

२. भारतातील इतर कामगार वर्गाप्रमाणे गिरणी कामगार स्त्रिया, बिडी कामगार स्त्रिया, नगरपालिका व रेल्वे कामगार स्त्रियांना कारखान्यात काम करीत असता

   अ. वर्षातून २१ दिवसांची कॅज्युअल राजा (सी. एल.) व

   ब. एक महिन्याची रजा

   क. काम करीत असताना दुखापत झाल्यास वाजवी नुकसान भरपाई मिळावी. तसेच

ड. २० वर्षे नोकरी झाल्यानंतर कमीत कमी दरमहा १५ रुपये पेन्शन त्या-त्या संस्थेकडून कायद्याने देण्याची योजना करण्याची तजवीज करावी.

३. बऱ्याच ठिकाणी गिरण्यांत काम करणाऱ्या स्त्री कामगारांवर देखरेख ठेवण्याकरिता पुरुष नेमले जातात. त्यामुळे स्त्री कामगारांना अनेक प्रसंगी जुलूम, अत्याचार सोसावा लागतो. म्हणून गिरण्यांत व इतरत्र गटाने काम करणाऱ्या स्त्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी स्त्री कामगारच नेमण्याची तरतूद सरकारने कायद्याने करावी.

४. ज्याप्रमाणे मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळावर तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर स्त्री प्रतिनिधी घेतला जातो. त्याचप्रमाणे अस्पृश्य वर्गातील स्त्रियांची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी त्यांचे प्रतिनिधी वरील सर्व ठिकाणी राखीव जागांद्वारे घेण्याची तरतूद सरकारने कायद्याने करावी. हा ठराव म्हणजे केवळ अस्पृश्य नव्हे तर सर्व स्त्री कामगारांना मानवी हक्क मिळवून देणारे प्रभावी अस्त्र होते.

**खाण-प्रसूती लाभ कायदा आणि त्यात घडवून आणलेल्या सुधारणा :-**

**खाण प्रसूती लाभ कायदा-१९४१**[१]

- स्त्री-कामगारांस ८ आठवड्याचा लाभ ८ आणे प्रतिदिन या दरानुसार द्यावा.

यामध्ये

अ. प्रसूतीपूर्वीचे पहिले ४ आठवडे स्त्री-कामगार स्वेच्छेने आराम न करता काम करून पूर्ण वेतन मिळवू शकेल. तसेच

ब. आरामाकरिता 'कामावरून गैरहजर' राहिल्यास ती प्रसुती-लाभ प्राप्त करू शकेल.

क. प्रसूतीनंतरचा ४ आठवड्याचा कालावधी हा आरामाचा असेल.

ड. त्या अवस्थेत तिचे काम करणे गैरकायदेशीर आणि गुन्हा आहे म्हणून अशा अवस्थेतील कोणत्याही स्त्री कामगाराने काम करू नये.

इ. या कालावधीत तिला प्रसूती-लाभावरच संतुष्ट राहावे लागेल.

प्रस्तुत कायदा योग्य वाटत असला तरी त्यातील काही त्रुटींमुळे प्रत्यक्षात या कायद्याचा लाभ मिळविण्यात स्त्री कामगारांना अडचणी निर्माण होत असत. या त्रुटी लक्षात घेऊन त्या दूर करण्याच्या हेतूने २९ जुलै १९४३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'खाण प्रसूती लाभ विधेयक' केंद्रिय सभागृहात मांडले.

**<u>खाण प्रसूती लाभ विधेयक-1943</u>**[२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेल्या सुधारणा

अ. या कायद्यात 'कामावरून गैरहजर' असे शब्द असून ते असंदिग्ध व अस्पष्ट आहेत.

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

ब. समजा कोणत्याही विशिष्ट दिवशी खाणीच्या मालकाने खाण बंद ठेवली तर त्यादिवशी स्त्री कामगारांस प्रसूती लाभ मिळण्याचा अधिकार नाही. कारण या कायद्यामधील 'कामावरून गैरहजर' या शब्दाची संदिग्धता होय.

क. या शब्दाचा असाही अर्थ निघतो की, काम आहे परंतु जर खाण बंद केली तर काम नाही.

ड. म्हणून या अस्पष्ट व असंदिग्ध शब्दाची आवश्यकता नाही.

इ. हा शब्द कायद्यातून वगळण्यात यावा.

फ. ज्यामुळे स्त्री कामगारांना 'खाण प्रसूती लाभ कायद्याचा' फायदा घेता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेली 'कामावरून गैरहजर' या शब्दाची असंदिग्धता व त्यामुळे स्त्री कामगारांना येणाऱ्या समस्या ही बाब सर्वसामान्यांच्या सहज लक्षात येण्यासारखी नव्हती. परंतु त्यामुळे स्त्री कामगारांचे आर्थिक नुकसान होत होते. वरील सुधारणा सुचवून डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना आर्थिक शोषणापासून वाचवले. त्यांनी स्त्रियांच्या समस्यांचे आणि कायद्यांचे बारकाईने परीक्षण केले होते, हे यातून निदर्शनास येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हे 'खाण प्रसूती लाभ विधेयक' मंजूर करण्यात आले.

**<u>कामगार वस्तीला भेट</u> :-**

कामगारांचे प्रश्न समजून घेण्यासाठी केवळ ऐकीव माहितीवर अवलंबून न राहता त्यांच्या प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाणे आवश्यक होते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्यासोबत कामगार मंत्रालयाचा ताफा घेऊन धनबाद, तिसरा, राणीगंज, सीतापूर, इत्यादी ठिकाणच्या कोळसा खाणीतील कामगारांची प्रत्यक्ष चौकशी करण्यासाठी गेले.

भूमिगत कामगारांच्या समस्या समजून घेण्यासाठी धनबाद येथे डॉ. आंबेडकर स्वतः ४०० फूट खोल खाणीत उतरले. जमिनीत इतक्या खोलवर गेल्यावर उद्भवणाऱ्या प्रश्नांची शहानिशा करून घेतली. स्त्री आणि पुरुषांनी भूमिगत खाणीत काम करणे अनेक शारीरिक समस्यांना आमंत्रण देण्यासारखे होते, ही गोष्ट ते समजून चुकले होते.

डॉ. आंबेडकरांनी तेथील स्त्री-पुरुष कामगारांना मजुरी, सोयी, सुविधा, सवलती इत्यादी बाबतचे प्रश्न विचारले. कामगारांचे राहणीमान जाणून घेण्यासाठी स्वतः धनबाद येथील खाण कामगार वस्तीला भेट दिली. त्यांची घरे, पिण्याचे पाणी व इतर सोयी, त्यांच्या भोजनाचे स्वरूप, प्रमाण अशा अनेक छोट्या-मोठ्या बाबींचे निरीक्षण केले.[3]

दुसऱ्या दिवशी डॉ. आंबेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी राणीगंज येथील खाणीला भेट दिली. खाणीचे निरीक्षण आणि खाण कामगारांशी बोलणे झाल्यावर त्यांनी तेथील सोयी-सुविधांची माहिती करून घेतली.

सुरु होण्याच्या तयारीत असलेले व आधुनिक वैद्यकीय उपकरणे असणारे हॉस्पिटल आणि Leper Welfare Centre,

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

कार्यरत असलेले Baby Care Centre आणि खाण कामगारांच्या मुलांसाठी शाळा अशा सोयी-सुविधा तेथील मालकाने आपल्या मजुरांना उपलब्द्ध करून दिल्या होत्या. त्याची कामगिरी प्रशंसनीय होती. परंतु खाण कामगारांची मुले अपुऱ्या आहारामुळे कुपोषित असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लक्षात आले.[४]

त्यानंतर त्यांनी तिसरा व सीतापूर खाणींचेही परीक्षण केले.

या खाण भेटीनंतर व पर्यवेक्षणानंतर ज्या-ज्या समस्या त्यांना जाणवल्या त्यावर तोडगा म्हणून विविध कामगार कायद्यांमधून त्यांनी स्त्री आणि पुरुष कामगारांसाठी तरतूदी सुचविल्या. आपल्या 'कामगार मंत्री' या कारकिर्दीत हे कायदे पास करून घेण्यास डॉ. आंबेडकर सदैव आग्रही राहिले.

**<u>स्त्री कामगारांवरील बंदी नाकारली</u> :-**

स्त्री कामगारांनी भूमिगत कोळसा खाणीत काम करावे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत कधीही नव्हते. परंतु तेव्हाच्या परिस्थितीत स्त्रियांना भूमिगत खाणीतील कामावरून काढून टाकले तर त्यांच्या कुटुंबापुढे जे संकट निर्माण होईल ते भूमिगत काम करणाऱ्या महिलांच्या संकटापेक्षा मोठे असेल, याची जाणीवही त्यांना होती. त्यामुळे १३ मार्च १९४५ रोजी केंद्रीय विधानसभागृहामध्ये 'कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना भूमिगत खाणीत काम करण्यास बंदी आणावी की नाही' यासंदर्भात उत्तर देताना ते म्हणाले, "मला सांगण्यात आले की कोळसा खाणीत १५ हजार स्त्रिया काम करतात आणि त्या अधिक कोळशाचे उत्पादन करु शकण्यास असमर्थ आहेत. अनेकदा असा युक्तिवाद केला जातो की, महिला अधिक कोळसा उत्पादन करू शकत नाहीत. परंतु हे खरे नाही, ही गोष्ट मी सभागृहाच्या लक्षात आणू इच्छितो."[५]

महिला ही पुरुषापेक्षा शारीरिकदृष्ट्या दुर्बल आहे, ही कल्पनाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नव्हती.

**<u>दुसरे खाण प्रसूती लाभ विधेयक - २९ मार्च १९४५</u> :-**

‘भूमिगत कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना प्रसूती लाभ कायद्याचा फायदा मिळवून देणे’ हा या विधेयकाचा मुख्य उद्देश होता.

तरतूदी :

या विधेयकात मुख्य दोन तरतूदी सुचविण्यात आल्या.

अ. प्रसूती पूर्वीच्या रजेच्या पहिल्या आठवड्यांचा कालावधी वाढवून १० आठवडे करावा.

अर्थात कोणत्याही महिला कामगारास प्रसूतीपूर्वी १० आठवडे भूमिगत कोळसा खाणीत काम करण्यास परवानगी राहणार नाही.

ब. प्रसूतिपूर्व १० आठवडे आणि प्रसूतीनंतरचे ४ आठवडे असे एकूण १४ आठवडे दर

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

दिवशी १२ आणे या प्रमाणे लाभ मिळेल. ६ महिन्यांच्या काळात फक्त १० दिवस भूमिगत खाणीत काम केल्यास महिला कामगार प्रसूती लाभ घेण्यास पात्र ठरतील.[६]

प्रस्तुत विधेयक सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यात आले. सिलेक्ट कमिटीने या विधेयकात काही बदल केले ते पुढीलप्रमाणे:-

अ. सिलेक्ट कमिटीने प्रसूतीपूर्व १० आठवड्याच्या कालावधीची तरतूद मान्य केली.

ब. प्रसूतीनंतरचा लाभ प्राप्त करण्याचा काळ ४ आठवड्यांऐवजी ६ आठवडे केला.

तसेच

क. लाभराशी ८ आणे प्रतिदिन न ठेवता ६ रुपये प्रति आठवडा अशी केली.

अशा या स्तुत्य बदलांनंतर हे विधेयक मंजूर करण्यात आले.

**खाण कामगार कल्याण निधी**[७] :-

खाण कामगार कल्याण निधीचा मुख्य उद्देश गरोदर कामगार स्त्रिया, तान्ही मुले, लहान बालके यांची काळजी घेणे हा असेल.

**खाण कामगारांच्या मुलांसाठी व्यवस्था**[८] :-

कामावर असताना मुलांची आबाळ होऊ नये यासाठी प्रत्येक खाणीजवळ एका पाळणाघराची व्यवस्था केली जावी, असे डॉ. आंबेडकरांनी सुचविले.

खाण कामगार कल्याण निधीमधून खाण कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी स्कॉलरशिपची तरतूद केली जाईल, असेही सुचविण्यात आले.[९]

या तरतुदींमध्ये अटींचाही समावेश होता-

अ. खाण कामगारांची मुलं आणि मुली जी १० वी उत्तीर्ण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी वैज्ञानिक व तांत्रिक विषय निवडतील त्यांना खाण कामगार कल्याण निधीमधून स्कॉलरशिप देण्यात येईल.

ब. ज्या मुली कलाशाखेतून पदवी घेतील व पुढे शिक्षिकेचा अभ्यासक्रमपूर्ण करतील त्यांनाच स्कॉलरशिप देण्यात येईल.

क. हमी देऊन शिक्षिकेचा अभ्यासक्रम पूर्ण केला नाही तर स्कॉलरशिपच्या रकमेचा पुनर्भरणा करावा लागेल.

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

अस्पृश्य मुलंमुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. त्यातही जे शिकत ते मधेच शिक्षण सोडून देत. मुलींमधील गळतीचे प्रमाण तर फार मोठे होते. या मुला-मुलींना शिक्षणासाठी प्रवृत्त करण्यासाठी तसेच त्यांनी व्यवसायाभिमुख शिक्षण घ्यावे जेणे करून शिक्षण संपल्यानंतर ती आपल्या पायावर उभी राहतील, आपल्या आई-वडिलांसारखे खाणीत काम करणार नाहीत. मुलींच्या लग्नाची घाई केली जाणार नाही. यासाठी या अटींचा समावेश तरतुदींमध्ये करण्यात आला.

**कामगार कल्याण निधी**[१०] :-

१५ फेब्रुवारी १९४४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'कोळसा खाण कामगार' अध्यादेश काढला. कोळसा खाण कामगारांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी कल्याण निधी असला पाहिजे. तरच कामगार कल्याणाच्या विविध कार्यक्रमांना प्रोत्साहन मिळेल. ही त्यामागील भूमिका होती.

हा अध्यादेश त्वरित लागू करण्यात आला.

या अध्यादेशात असे नमूद करण्यात आले होते की,

अ. भारताच्या कोळसा खाणीतून रेल्वेद्वारे पाठविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या कोळसा व सॉफ्ट कोकवर केंद्र सरकार कर लावेल.

ब. ज्याचा दर वेळोवेळी निर्धारित केला जाईल.

क. सल्लागार समितीशी विचार विनिमय करून नंतर भारतीय गॅझेटमध्ये प्रकाशित केला जाईल.

ड. हा कर प्रतिटन १ आण्यापेक्षा कमी नसेल आणि ४ आण्यापेक्षा अधिक राहणार नाही.

इ. कोळसा खाण कामगार कल्याण विधेयक अध्यादेशाद्वारे केंद्रसरकारला एक सल्लागार समिती गठीत करण्याचा अधिकार देण्यात आला.

फ. ज्यामध्ये कोळसा खाणीचे मालक तसेच कोळसा खाण कामगार या समितीचे सदस्य राहतील, असे सुचविले. तसेच

या सल्लागार समितीमध्ये एक महिला प्रतिनिधी आवश्यक आहे असेही सुचविण्यात आले.

कामगार कल्याण निधीतून ज्या कामगार कल्याण कार्यक्रमासाठी पैसा देण्याची तरतूद करण्यात आली ते कार्यक्रम पुढीलप्रमाणे :-

अ. कामगारांना घर देणे.

ब. पाण्याची व्यवस्था करणे.

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

क. शैक्षणिक सोयींमध्ये सुधारणा करणे.

ङ. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेमध्ये सुधारणा करणे.

इ. रोगराईवर प्रतिबंध करणे.

फ. वैद्यकीय सोयींची तरतूद आणि अस्तित्वात असलेल्या सोयींमध्ये सुधारणा करणे.

ग. कामगारांच्या राहणीमानाचा स्तर उंचावणे, ज्यामध्ये पोषण, सामाजिक परिस्थितीत सुधारणा, मनोरंजनाच्या सोयी आणि दळणवळणाच्या सोयी इत्यादींचा समावेश असेल.

ह. इतर

**<u>समान वेतन कायदा</u>**[११] :-

“पुरुष आणि स्त्रिया यांच्यामध्ये अधिकार आणि हक्कांच्या संदर्भात कोणताही भेद करता कामा नये. या अनुषंगाने कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांना पुरुष कामगारांइतकीच मजुरी मिळाली पाहिजे. कारण या दोघांचीही श्रमाचे काम करण्याची क्षमता सारखी आहे”, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्पष्ट मत होते. ८ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांच्या या प्रयत्नांनाही यश प्राप्त झाले. या दिवशी स्त्री कामगारांनासुद्धा पुरुष कामगारां इतकेच वेतन देण्याचा कायदा पास करण्यात आला.

**<u>भारतीय खाण विधेयक</u>**[१२] :-

'भूमिगत कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्रिया आणि पुरुष कामगारांच्या स्वास्थ्याची पूर्ण काळजी घेणे ही शासनाची जबाबदारी आहे', असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर परखडपणे म्हणत.

खाणीमध्ये काम करणाऱ्या पुरुष आणि महिला कामगारांचे अंग आणि कपडे खराब होतात. त्यामुळे त्यांना त्वचेचे रोग होण्याची भीती असते. म्हणून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने खाण मालकांनी विशेष सवलती कराव्यात. यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९२३ च्या 'भारतीय खाण कायद्यात' सुधारणा करणारे 'भारतीय खाण विधेयक' ८ फेब्रुवारी १९४२ ला केंद्रीय विधानसभेत मांडले.

**तरतूदी :**

अ. खाणीच्या बाजूला कामगारांसाठी स्नानगृहे बनविणे. ज्यामध्ये शॉवर आणि लॉकर रूम इत्यादींचा प्रबंध आणि शौचालयसुद्धा असेल. त्याचप्रमाणे

ब. स्त्री कामगारांसाठी अशीच वेगळी व्यवस्था करण्यात यावी.

क. पुरुष आणि स्त्री कामगारांकरिता स्नानगृह आणि शौचालयांची संख्या ही त्यांच्या एकूण संख्येच्या प्रमाणात असावी.

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

ङ. जर खाण मालकांनी १२ महिन्यांच्या आत कामगारांकरिता स्नानगृहे बनविली तर खर्चाच्या १० टक्के रक्कम सरकारतर्फे देण्याची तरतूद करण्यात आली होती.

इ. खाणीत जाताना स्त्रियांनी टोप्या घालाव्या, असे सुचविण्यात आले.

**<u>कारखाना विधेयक १९४६</u>**[१३] :-

२१ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'कारखाना विधेयक' मांडले. या विधेयका-नुसार असे सुचविण्यात आले की,

अ. वर्षभर चालणाऱ्या कारखान्यातील कामाचे अधिकतम तास जे १९३५ च्या कारखाना कायद्यानुसार ५४ प्रति आठवडा होते. ते ४८ प्रति आठवडा करावे. आणि

ब. हंगामी कारखान्यातील कामाचे तास यापूर्वी ६० प्रति आठवडा होते, ते ५४ प्रति आठवडा करावे.

प्रस्तुत विधेयक सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यात आले. त्यानंतर ४ एप्रिल १९४६ रोजी हे विधेयक पास करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कामगारांच्या समस्यांची जाणीव होती. कामगारांमधील स्त्री-पुरुष भेद- भावाचीही कल्पना होती. कामगार स्त्रियांचे कामाच्या ठिकाणी शारिरीक, मानसिक आणि आर्थिक असे तिहेरी शोषण होते. त्यामुळे त्यांनी स्त्री कामगारांना पुरुष कामगारांच्या बरोबरीने संधी दिली. किंबहुना स्त्री कामगारांचा पुरुष कामगारांपेक्षाही अधिक विचार केला. कामाचे तास, समान काम समान वेतन, समान संधी, कामाचे स्वरूप इत्यादी बाबतीत त्यांनी स्त्रियांना न्याय मिळवून दिला. स्त्री कामगारांना प्रसूतिपूर्व व प्रसूतीनंतरच्या काळात आवश्यक तरतूदी, तान्हया बाळांसाठी पाळणाघरे, कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहे, स्वच्छ पाण्याची सोय, पोषक आहार, वैद्यकीय सुविधा, कामगार कल्याण निधी अशा एक ना अनेक तरतूदी आणि विधेयके करून त्यांनी स्त्री कामगारांना दिलासा दिला. त्यांनी मांडलेली स्त्री कामगार विधेयके पुरोगामी आहेत. अत्यंत नाविन्यपूर्ण तरतुदींचा त्यामध्ये अंतर्भाव केलेला दिसतो. यातून डॉ. आंबेडकरांना स्त्री कामगारांबद्दल असलेली सहानुभूती व संवेदना तर व्यक्त होतेच पण त्याचबरोबर स्त्री कामगारांच्या समस्यांच्या दृष्टीने केलेले गहन चिंतन लक्षात येते. आज अर्थव्यवस्थेत स्त्रियांचा वाढता सहभाग आणि स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य पाहिले की पदोपदी डॉ. आंबेडकरांच्या द्रष्टेपणाची खात्री पटत जाते.

**२. कायदे मंत्री आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री कामगारांचे हक्क व अधिकार :**

कायदा हे अन्यायाविरुद्ध बंड करण्याचे साधन आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांच्या संवर्धनासाठी संविधानात्मक तरतूदी आवश्यक ठरतील. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जाणून होते. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

आंबेडकरांना भारतातील पुरूष प्रधान मानसिकतेचा आणि जाचक रूढी-परंपरांचाही चांगलाच अभ्यास होता. भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीत चूल आणि मूल यामध्ये जखडलेल्या, जनावरासारखे जीवन जगणाऱ्या भारतीय स्त्रियांना अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचा सर्वांगीण विकास करणे हे डॉ. आंबेडकरांनी आपले जीवित कार्य मानले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, "स्त्रियांच्या सहभागाशिवाय ऐक्य निरर्थक आहे. सुशिक्षित स्त्रियांशिवाय शिक्षण निरर्थक आहे आणि स्त्रियांच्या सामर्थ्याशिवाय आंदोलन अपूर्ण आहे."[१४] त्यादृष्टीने स्त्रियांची अस्मिता, स्वाभिमान आणि आत्मसन्मान टिकविण्यासाठी, तसेच स्त्रियांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानांतर्गत स्त्री व पुरुषांना समान हक्क दिले असून धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदाभेद करता येणार नाही हे सुद्धा स्पष्ट केले.

**<u>भारतातील स्त्री कामगारांसाठी घटनेत नमूद करण्यात आलेले हक्क आणि सुरक्षितता पुढीलप्रमाणे</u>**

**भाग तीन**

**मूलभूत हक्क**

**सर्वसाधारण**

**समानतेचा हक्क**

**अनुच्छेद १५. (३)** या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरीता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.[१५]

**अनुच्छेद १६. (१)** राज्याच्या नियंत्रणाखाली कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल.[१६]

**अनुच्छेद १६. (२)** कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास या किंवा यांपैकी कोणत्याही कारणांवरून राज्याच्या नियंत्रणाखाली कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरता अपात्र असणार नाही अथवा त्यांच्याबाबतीत त्याला प्रतिकूल भेदभाव केला जाणार नाही.[१७]

**भाग तीन**

**मूलभूत हक्क**

**स्वातंत्र्याचा हक्क**

**अनुच्छेद १९. (१)** सर्व नागरिकांस --

**(छ)** कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालवण्याचा,

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

हक्क असेल.[१८]

**अनुच्छेद २३ (१)** माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतूदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.[१९]

**अनुच्छेद २३ (२)** सार्वजनिक प्रयोजनाकरिता सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही व अशी सेवा करावयास लावताना केवळ धर्म वंश जात व वर्ग या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.[२०]

**भाग चार - मार्गदर्शक तत्त्वे**

**राज्य धोरणांची निर्देशक तत्वे**

**अनुच्छेद ३९.** राज्य हे विशेषतः पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखील --

**(क)** उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा;

**(घ)** पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे;

**(ङ)** स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पडू नये;[२१]

**अनुच्छेद ४२.** राज्य हे, कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसुतीविषयक सहाय्यासाठी तरतूद करील.[२२]

**भाग चार - (क)**

**मूलभूत कर्तव्ये**

**अनुच्छेद ५१ (ङ)** धार्मिक, भाषिक आणि प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे;[२३]

भारतीय कामगार स्त्रियांना व्यक्तिस्वातंत्र्य व समान हक्क दिल्याशिवाय त्यांची उन्नती होणे अशक्य आहे, याची जाणीव ठेवून डॉ. आंबेडकरांनी घटनेत विविध तरतूदींचा समावेश केला. भारतीय नागरिक म्हणून घटनेतील मूलभूत अधिकार सर्वांसाठी समान दिले गेले. राज्यघटनेच्या चौथ्या भागात म्हणजे राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वात अनुच्छेद ३९ मध्ये स्त्री-पुरुषांना उपजीविकेची साधने मिळवण्याचा समान हक्क असेल आणि समान कामाबद्दल समान वेतन देण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. स्त्रियांच्या प्रसूतिविषयक सहाय्यासाठी अनुच्छेद ४२ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. तसेच स्त्रियांना रूढी-परंपरांतून मुक्त करण्यासाठी व बंधुभाव आणि सामंजस्य वाढीस लावण्यासाठी अनुच्छेद ५१(ङ)

अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री कामगारांना दिलेल्या संविधानिक हक्क व अधिकारांमुळे स्त्री कामगारविषयक कायद्यांना अधिक बळकटी आली आहे.

**२१व्या शतकातील कामगार (नोकरदार) स्त्री**

२१व्या शतकातील स्त्री ही कर्ती स्त्री म्हणून ओळखली जाते. बहुतेक सर्वच क्षेत्रांत स्त्रियांचे साम्राज्य दिसून येते. पुरुषांच्या खान्द्याला खांदा लावून स्वबळावर उभे राहण्याची स्वप्न पाहणारी स्त्री आता पुरुषापेक्षाही एक पाऊल पुढेच दिसत आहे. सर्व क्षेत्रांत तिचा मुक्त संचार, पुढाकार तिची सक्षमता दाखवून देतो. गृहिणी, व्यावसायिका किंवा कामगार अशा विविध रूपात भेटणारी स्त्री आपल्या सामाजिक हक्क-अधिकारांविषयी जागृत झाली आहे. यापैकी कामगार स्त्री कामाच्या ठिकाणी आपल्यासाठी असणाऱ्या तरतूदींविषयी जागृत आहे.

**तथ्य संकलन आणि निष्कर्ष**

या शोधनिबंधाकरिता मी एक सर्वेक्षण केले. त्यासाठी २२६ कामगार स्त्रियांचा नमुना यादृच्छिक पद्धतीने निवडला गेला. वय वर्ष २० च्या पुढील वयोगटातील विविध क्षेत्रांत नोकरी करणाऱ्या स्त्रियांकडून प्रश्नावलीच्या आधारे मुलाखत घेऊन माहिती मिळविली. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री कामगारांसाठी सुचविलेल्या तरतूदी आणि केलेले कायदे याचा कामगार स्त्रियांना कितपत फायदा होतो आहे', याचा अभ्यास करण्यात आला. या माहितीच्या आधारे काढण्यात आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

**कोष्टक क्र. ३.१**

**कामगार स्त्रियांना वेतनाव्यतिरिक्त मिळणाऱ्या सोयी किंवा सवलतींनुसार वर्गीकरण**

| कामगार स्त्रियांना वेतनाव्यतिरिक्त सोयी किंवा सवलती मिळतात का? | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ११९ | ५२.७% |
| नाही | १०७ | ४७.३% |

**स्रोत : प्रत्यक्ष नमुना पाहणी**

कोष्टक क्र. ३.१ वरून असे निदर्शनास येते की, एकूण २२६ कामगार स्त्रियांपैकी ११९ स्त्रियांना पगाराव्यतिरिक्त इतर सवलती मिळतात. तर १०७ स्त्रियांना पगाराव्यतिरिक्त इतर कोणत्याही सोयी सवलती मिळत नाहीत.

सरकारी, निमसरकारी तसेच काही खाजगी क्षेत्रांत कायमस्वरूपी कामगार वर्गाला वेतनाव्यतिरिक्त सोयी सवलती दिल्या

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020


जातात. परंतु बऱ्याचशा सेवा क्षेत्रांमध्ये विशेषतः असंघटित क्षेत्रांमध्ये अशा प्रकारच्या सोयी सवलती दिल्या जात नाहीत. तात्पुरत्या कामगार वर्गालाही या सोयी सवलती उपलब्द्ध होत नाहीत.

**कोष्टक क्र. ३.२**

**कामगार स्त्रियांना वेतनाव्यतिरिक्त सोयी / सवलती मिळत असल्यास त्यांचे स्वरूप**

| वेतनाव्यतिरिक्त मिळणाऱ्या सोयी किंवा सवलती | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| प्रवासभत्ता | ९३ | ७८.२% |
| राहण्याची सोय | ३५ | २९.४% |
| वैद्यकीय भत्ता | ६२ | ५२.१% |
| इतर | २४ | २०.२% |

**स्रोत : प्रत्यक्ष नमुना पाहणी**




**आलेख क्र. १**

**कामगार स्त्रियांना वेतनाव्यतिरिक्त सोयी / सवलती मिळत असल्यास त्यांचे स्वरूप**

आलेख क्र. १ वरून असे निदर्शनास येते की, एकूण २२६ कामगार स्त्रियांपैकी ज्या ११९ स्त्रियांना पगाराव्यतिरिक्त सोयी सवलती मिळतात त्यामध्ये ९३ (७८.२%) स्त्रियांना प्रवासभत्ता मिळतो. कंपनीतर्फे राहण्याची सोय ३५ (२९.४%) स्त्रियांना उपलब्द्ध आहे. वैद्यकीय भत्ता ६२ (५२.१%) स्त्रियांना मिळतो. तर इतर सोयी सवलती मिळणाऱ्या २४ (२०.२%) लाभार्थी स्त्रिया आहेत. (११९ स्त्रियांपैकी अनेक स्त्रियांना पगाराव्यतिरिक्त एक पेक्षा जास्त सोयी-सवलती मिळतात.)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच हे शक्य झाले. त्यांनी केलेल्या कायद्यांचा लाभ या कामगार स्त्रियांना मिळत आहे.कामाच्या ठिकाणी मूलभूत सोयी सुविधा उपलब्द्ध करून द्याव्या, असेही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविले होते. त्याचा फायदा स्त्रियांना

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020


पुढीलप्रमाणे मिळतो.

**कोष्टक क्र. ३.३**

**कामाच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या सोयी-सुविधांचे स्वरूप**

| कामाच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या सोयी-सुविधा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| स्वछता गृहे | २२२ | ९८.२% |
| पिण्याचे पाणी | २२१ | ९७.८% |
| विश्रांतीसाठी निवारा | १२३ | ५४.४% |
| येण्या-जाण्याची सोय | १४६ | ६४.६% |
| प्रथमोपचार | ७५ | ३३.२% |
| इतर | ३३ | १४.६% |

**स्रोत : प्रत्यक्ष नमुना पाहणी**




**आलेख क्र. २**

**कामाच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या सोयी-सुविधांचे स्वरूप**

आलेख क्र. २ वरून असे निदर्शनास येते की, एकूण २२६ कामगार स्त्रियांपैकी २२२ (९८.२%) व २२१ (९७.८%) स्त्रियांना कामाच्या ठिकाणी अनुक्रमे स्वच्छतागृहे व पिण्याचे पाणी उपलब्द्ध आहे. कामाच्या ठिकाणी स्त्रियांसाठी स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याची सोय असणे ही मूलभूत गरज आहे. १२३ (५४.४%) स्त्रियांना कामाच्या ठिकाणी विश्रांतीसाठी निवारा उपलब्द्ध आहे. कामाच्या ठिकाणी येण्या

व जाण्यासाठी कंपनीची बस, व्हॅन किंवा कार सुविधा उपलब्द्ध असणाऱ्या १४६ (६४.६%) स्त्रिया आहेत. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या किरकोळ अपघातांसाठी ७५ (३३.२%) स्त्रियांना प्रथमोपचाराची सुविधा उपलब्द्ध आहे. तसेच ३३ (१४.६%) स्त्रियांना इतर सोयीसुविधा उपलब्द्ध आहेत जसे- पाळणाघरे, जेवणाची व्यवस्था इत्यादी.

अशा साध्या वाटणाऱ्या परंतु अत्यंत गरजेच्या असणाऱ्या सोयी-सुविधा कामाच्या ठिकाणी उपलब्द्ध असल्यामुळे स्त्रिया निश्चिंतपणे व सक्षमतेने आपला कार्यभार पार पाडू शकतात. डॉ. आंबेडकरांनी सुचविलेल्या तरतुदींमुळे हे शक्य झाले.

**शिफारशी :**

- शक्य तेथे नोकरीच्या कामाच्या वेळांमध्ये लवचिकता असावी.
- काही स्त्रिया कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे किंवा काही वैयक्तिक कारणांमुळे काही काळासाठी नोकरी सोडतात. अशा स्त्रियांना पुन्हा काम करण्याची इच्छा असेल तर त्यांना पुन्हा एकदा आपल्या कार्यक्षेत्रातील विकासासाठी (Second Carrier Opportunity) संधी द्यावी. अशा प्रकारच्या योजना खाजगी क्षेत्रांतील Tata, Nomura, Mahindra Logistics, Amazon India, Genpact अशा काही कंपन्यांनी राबविण्यास सुरुवात केली आहे.[२४]
- स्त्रियांकरिता घरातून काम (work from home) हा पर्याय उपलब्ध असावा.
- स्त्री म्हणून कामाच्या ठिकाणी तिच्या गरजांची पूर्तता करावी. जसे - आरोग्यसेवा, पिण्याचे स्वच्छ पाणी, विश्रांतीसाठी जागा, प्रसूती रजा, मुलांच्या संगोपनासाठी रजा, मुलांसाठी पाळणाघरे, कौटुंबिक आपत्कालीन परिस्थिती, सुरक्षित वेळा, सुरक्षित प्रवास, इत्यादी.
- स्त्रियांच्या नेतृत्त्व विकासासाठी उत्तेजन द्यावे. नेतृत्वपदे संपादन करण्यासाठी मार्गदर्शन करावे.
- आर्थिक क्षेत्रात सहभागी होणाऱ्या स्त्रियांसाठी शासनाने विशेष धोरणांची व योजनांची आखणी करावी.
- धोरणांमध्ये केलेली तर्कसुसंगत मांडणी, प्रत्यक्ष कृती कार्यक्रम आणि अंमलबजावणी या तिन्हीमध्ये सुस्पष्टता व लवचिकता असावी.

**समारोप :**

माणसाने प्रथम माणुसकीने जगावे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगत. त्यांच्या मते, भांडवलदार, जमीनदार, मक्तेदार आपल्या 'भांडवल' ह्या शक्तीवर इतरांचे शोषण करीत असतात. माणसाचे शोषण

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

प्रामुख्याने दोन प्रकारे होत असते. एक म्हणजे गुलाम म्हणून आणि दुसरे मजूर म्हणून. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान शोषणाविरुद्ध होते. त्यामुळे ते सर्वच कामगारांच्या हक्कांसाठी लढले. परंतु भारतीय संस्कृतीत स्त्रियांना गुलामासारखीच वागणूक मिळत आली आहे. त्यामुळे स्त्री कामगारांचे दोन प्रकारे शोषण होते. एक ती स्त्री म्हणून आणि दुसरे म्हणजे ती गुलाम म्हणून. ही परिस्थिती जाणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री कामगारांसाठी विशेष तरतूदी केल्या.

आज संघटित क्षेत्रात नोकरी करणाऱ्या बहुतेक सर्वच स्त्रिया आठवडा रजा (weekly holiday), आजारपणाची रजा (Sick Leave), प्रासंगिक राजा (Casual Leave), प्रसूतीआधी (pre-natal) व प्रसूतीनंतरची (post-natal) पगारी रजा, कामाचे आठ तास, अधिक काम अधिक वेतन (Over Time ), (स्त्री आणि पुरुषांना) समान काम समान वेतन, कामावर असताना दुखापत झाल्यास नुकसान भरपाई (compensation), निवृत्ती वेतन (Pension), इत्यादी हक्कांसाठी जागृत आहेत. हे हक्क कायद्यांद्वारे मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री कामगारांसंदर्भातील योगदान अभ्यासल्यास असे लक्षात येते की, कामगार कायदे, कामगार धोरणे व कामगार कल्याणाची व्यवस्था आज ज्याप्रकारे देशात अस्तित्वात व कार्यरत आहे त्याची पायाभरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. त्यांनी भारतातील कामगार आणि विशेषतः स्त्री कामगारांसाठी केलेले कार्य मौल्यवान आहे. त्यांनी कामगारांचे प्रश्न निरनिराळ्या प्रकारे हाताळले.

'कामगारांचे सरकार आल्याशिवाय कामगारांचे कल्याण साधले जाऊ शकत नाही.' अशा ठाम वक्तव्यांतून त्यांचा तत्ववेत्तेपणा दिसून येतो. तर त्यांनी मांडलेले स्त्री कामगारांसंबंधीचे विचार, स्त्री कामगारांपुढील वर्तमानकाळातील तसेच भविष्यकाळातील समस्यांवरील उपाययोजना यांचा अभ्यास केला की, एका द्रष्ट्या नेत्याचाच प्रत्यय येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वाचे काम तर केलेच पण त्याहीपेक्षा त्या प्रत्येक समस्येवर उपाय सुचवून आपल्या विद्वत्ता व हजरजबाबीपणा या गुणांच्या साहाय्याने त्यावेळच्या सरकारला बहुतेक उपाययोजना मान्य करण्यास भाग पाडले. हे विशेष महत्त्वाचे. अशाप्रकारे ब्रिटिशांच्या साम्राज्यातही आपले विचार मानणारा व त्याचे अनुकरण करणारा स्वतंत्र गट तयार करणारे विसाव्या शतकातील कामगार कल्याणाचे महान नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या संघटन चातुर्य व नेतृत्व गुणांची सिद्धता देतात.

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

अर्थात स्वातंत्र्यपूर्व काळापासून ही धोरणे आणि उपाययोजना अस्तित्वात आहेत. मात्र आज स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षांनंतरही यातील बऱ्याचशा उपाययोजनांची अंमलबजावणी झालेली दिसत नाही. संघटित क्षेत्रातील स्त्रियांना यातील फायदे थोड्याबहुत फरकाने मिळत आहेत. मात्र असंघटित क्षेत्रातील स्त्रिया यांपासून अजूनही बऱ्याच लांब आहेत. आजही स्त्रियांना विशेषत: असंघटित क्षेत्रांत काम करणाऱ्या स्त्रियांना कामाच्या ठिकाणी हीन दर्जाची वागणूक मिळते. कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहे आणि पिण्याचे पाणी या मूलभूत सुविधाही आढळत नाहीत. स्वच्छतेसाठी कामाच्या ठिकाणापासून दूर जावे लागत असल्यामुळे अनेक प्रसंगांना स्त्रियांना तोंड द्यावे लागते. अजूनही पुरुषसत्ताकतेमुळे स्त्री कामगारांवर देखरेखीसाठी पुरुष व्यवस्थापक असल्यामुळे स्त्रियांचे शोषण होते. कामाचे तास, दर्जा, स्वरूप, वेतन या सर्व बाबतींत स्त्री-पुरुष भिन्नता आजही आढळते. याची अनेक कारणे सांगता येतील. जसे- स्त्रियांचा सामाजिक दुय्यम दर्जा, व्यवस्थापकांची स्त्री-कामगारांविषयीची संकुचित भूमिका, स्त्री कामगारांमधील अशिक्षित व अज्ञानीपणा, रुढी-परंपरा, नाविन्याचा अभाव, स्त्रियांची मानसिकता इत्यादी. परंतु जर शासनाने, सेवाभावी संस्थांनी, व्यवस्थापकांनी योग्य भूमिका घेऊन, जबाबदारीने कार्य केले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेले सर्व फायदे स्त्री कामगारांना मिळू शकतील, यात संशय नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा काळावर उमटविला आहे. त्यांचे स्त्री-पुरुष कामगारांच्या सर्वांगीण विकासाचे ऐतिहासिक कार्य आपण कधीही विसरु शकणार नाही.

**<u>संदर्भसूची</u> :-**

१. Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches, Vol. 10,Dr. Ambedkar as Member of The Governer-General Council 1942-46, Government Of Maharashtra, 1991, pg. no. 87.

२. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 88.

३. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 130.

४. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 132.

५. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 142-143.

६. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 275.

७. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 800.

८. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 848.

९. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 392-393.

१०. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 137.

११. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 143.

१२. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 323-325.

१३. Ebid, Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 10, pg. no. 336.

१४. Ambedkar: Writings and Speeches, Vol. 3, Department of Education, Govt. of Maharashtra, 2017, pg no. 69.

१५. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, भारताचे संविधान, साहिल प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, २०१६, पृ. क्र. ७४.

१६. उपरोक्त, भारताचे संविधान, पृ. क्र. ७५.

१७. उपरोक्त, भारताचे संविधान, पृ. क्र. ७५.

१८. उपरोक्त, भारताचे संविधान, पृ. क्र. ७६.

१९. उपरोक्त, भारताचे संविधान, पृ. क्र. ७९.

२०. उपरोक्त, भारताचे संविधान, पृ. क्र. ७९.

२१. उपरोक्त, भारताचे संविधान, पृ. क्र. ८६.

२२. उपरोक्त, भारताचे संविधान, पृ. क्र. ८७.

२३. उपरोक्त, भारताचे संविधान, पृ. क्र. ८९.

२४. Women and Men in India 2019 published by Ministry of statistics and Programme Implementation dated 31.03.2019.

**<u>इतर संदर्भ साधने</u> :-**

२५. डॉ. आगलावे प्रदीप, मराठी वृत्तपत्र 'दैनिक सम्राट', दिनांक ०८, ०९ व १० डिसेंबर, २००५.

२६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग १, १९२० ते १९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने समिती, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती, २००२.

२७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग २, १९२० ते १९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने समिती, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती, २००२.

२८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३, १९२० ते १९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने समिती, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती, २००२.

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

२९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १९, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता, १९२० ते १९२८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने समिती, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती, २००५

३०. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,१९६६.

३१. प्रा. डॉ. जोशी बी. आर., समाजवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५.

३२. केळकर भा. कृ., भारतभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९४.

३३. परब अ. ज., डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक चिंतन - एक प्रकटन, मेहता पब्लिशिंग, पुणे, १९९१.